# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८


जा.क्र.: मका/काशा/२०१५-१६/ 9522 दिनांक :- 29 /१२/२०१५

परिपत्रक

विषय:- बावीसावी पुरूष विभाग व बारावी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार
भजन स्पर्धा -२०१५-१६

संदर्भ:-मका/कार्यक्रम/२०१५-१६/१४४३ दिनांक २७-१०-२०१५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि बावीसावी पुरूष विभाग व बारावी महिला विभाग राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा **दिनांक २९ व ३० जानेवारी २०१६ या कालावधीत नागपूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या राज्यस्तरीय भजन स्पर्धेत प्रत्येक गटाने आपला पुरुष व महिला प्रथम क्रमांक विजयी भजन संघ स्पर्धेकरीता पाठवावा.प्रत्येक गटाच्या भजनी संघास सादरीकरण खर्च रु.२०००/- (रुपये दोन हजार) फक्त प्रत्येकी मंजूर करण्यात येत आहे.सदर रक्कम कार्यक्रम स्थळी अदा करण्यात येईल.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व संघाच्या ८ अधिक ४ साथीदार १२ स्पर्धकांना कार्यक्रम स्थळी येण्या-जाण्याचा रेल्वे/एस.टी प्रवास खर्च आरक्षण शुल्कासह मंजूर करण्यात येत आहे.तसेच दैनिक भत्ता प्रत्येकी प्रतिदिनी रु.१००/- प्रमाणे निघालेल्या दिवसापासून परत येईपर्यंतचा जास्तीत-जास्त ४ दिवसाचा दैनिक भत्ता मंजूर करण्यात येत असून सदरची रक्कम **लोन्स ॲण्ड अँडव्हान्सर** काढण्यास संबंधित कामगार कल्याण अधिकारी यांना परवानगी देण्यात येत आहे.कामगार कल्याण अधिकारी यांनी प्रत्यक्ष याबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करुन स्पर्धेपूर्वी संबंधित संघ व्यवस्थापकांना रक्कम उपलब्ध करुन द्यावी.मंडळाकडून भोजनाची व्यवस्था केल्यास दिनांक २९ व ३० जानेवारी २०१६ रोजीचा २ दिवसाचा दैनिक भत्ता गट कार्यालयात जमा करण्यात यावा.

संघासोबत केंद्र प्रमुखास भजन संघाचे संघप्रमुख म्हणून जाण्याची परवानगी देण्यात येत असून नियमाप्रमाणे प्रवास खर्च व दैनिक भत्ता मंजूर करण्यात येत आहे.

स्पर्धेत भाग घेतलेल्या संघाने भजन स्पर्धेत भजन सादर न केल्यास स्पर्धेच्या त्या दिवसाचा पूर्ण खर्च संघाकडून वसूल करण्याची संपूर्ण जबाबदारी सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त यांची राहील.त्यांनी आपल्या स्तरावर वसुली आदेश काढून एक प्रत या कार्यालयाकडे पाठवावी.

स्पर्धेचे ठिकाण व स्पर्धेकाची निवास व्यवस्था बाबतची माहिती सहाय्यक कल्याण आयुक्त,विभागीय कार्यालय,नागपूर हे त्यांच्या स्तरावर कळवतील.

Jadhav
कल्याण आयुक्त

प्रत,

१) सर्व अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.
२) सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त /सर्व विभागीय कार्यालये/ कामगार क्रिडा भवन,मुंबई
३) कामगार विकास अधिकारी, कामगार कल्याण भवन,नागपूर/पुणे
४) सहाय्यक लेखा अधिकारी सर्व विभागीय कार्यालये
५) कामगार कल्याण अधिकारी,१८ गट कार्यालये. ★★★
६) केंद्र प्रमुख, सर्व केंद्र

★★★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन दयावे.